# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव
## (ग्रामपंचायत शाखा)

दुरध्वनी क्र.0257-2220152 Email-dycolvpjalgaon@gmail.com फॅक्स क्र.0257-2220500


क्र.साशा/ग्रामप/ईकावि/12/21/456 /2020 दिनांक 12/12/2020

**<u>ग्रामपंचायत निवडणुक तातडीचे</u>**

**प्रति,**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जळगांव
2. पोलीस अधिक्षक,जळगांव / आयुक्त, जळगांव शहर म.न.पा. जळगांव
3. निवासी उपजिल्हाधिकारी,जि.का.जळगांव
4. उपविभागीय अधिकारी, सर्व
5. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
6. अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, जळगांव
7. मुख्य अभियंता,जि.प.बांधकाम विभाग जळगांव
8. प्रबंधक, भारत दुरसंचार निगम लिमीटेड,जळगांव
9. विभागीय नियंत्रक,राज्य परिवहन मंडळ,जळगांव
10. कुलसचिव,उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ,जळगांव
11. कार्यकारी अभियंता, ग्रामीण महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमीटेड,जळगांव
12. उपवनसंरक्षक, जळगांव भाग व यावल भाग
13. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव
14. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जळगांव
15. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, जळगांव
16. तहसिलदार, सर्व
17. गटविकास अधिकारी, सर्व

**विषय -:** माहे एप्रिल 2020 ते डिसेंबर 2020 या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित एकुण 783 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रमाबाबत.

**संदर्भ -:** 1) मा. राज्य निवडणुक आयोगाचे पत्र क्र.रानिआ / ग्रापंनि - 2020/ प्र.क्र.01/ का - 8 दिनांक 11/12/2020 रोजीचा प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जळगांव जिल्हयातील माहे एप्रिल 2020 ते डिसेंबर 2020 या कालावधीत मुदत संपणा-या एकुण 783 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता मा. राज्य निवडणुक आयोग, मुंबई यांचेकडील दिनांक 11/12/2020 रोजीच्या पत्रान्वये संगणकीकृत पध्दतीने प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. यासोबत संदर्भिय पत्राची छायाकिंत प्रत जोडलेली आहे.

जळगांव जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक 15/01/2021 रोजी मतदान होणार असुन दिनांक 18/01/2021 रोजी मतमोजणी होणार आहे. मा. राज्य निवडणुक आयोग यांचेकडील दिनांक 29/11/2020 रोजीच्या आदेशान्वये ज्या जिल्हयामध्ये 50 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्या संपुर्ण जिल्हयामध्ये आचार संहिता लागु राहील,

सद्यस्थितीत जळगांव जिल्हयातील 1153 ग्रामपंचायतीपैकी एकुण 783 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुक असल्यामुळे संपुर्ण जळगांव जिल्हयामध्ये आचार संहिता लागु असेल.

तसेच सदर आचार संहिता ग्रामपंचायतींच्या निवडणुक कार्यक्रम जाहिर केल्यापासुन ते निवडणुकीचा निकाल जाहिर होईपर्यंत लागु राहणार असल्याचे मा. आयोगाकडून आदेशित करण्यात आलेले आहे.

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक करीता मा. राज्य निवडणुक आयोग यांचेकडील दिनांक 29/11/2019 मधील आदेशानुसार आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी. तसेच याकामी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

स्वाक्षरीत/-
**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी जळगांव**

**प्रत :-जिल्हा माहिती अधिकारी,जळगांव**

2/- आपण याबाबतची बातमी जिल्हयातील सर्व दैनिकांमध्ये विनामुल्य प्रसिध्द करावी व त्याबाबतचे कात्रण या कार्यालयास सादर करावे.

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी जळगांव**